# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

- कवितेचे शीर्षक : - स्वरचित
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. शीला वाघ

माणसांना स्वास्थ्य प्रदान करते,
संगीत एक साधन
स्वर, गीत, तालांचा मिलाफ
बनवते नाद युक्त गायन

शांत समयासी मोहून टाकी
पक्षांचा किलबिलाट
समुद्रात उसळती लाटा
नाचत करिती खळखळाट

वाऱ्यावरती झुलती झाडे,
पाने करिती सळसळाट
मधुर संगीत मनास मोहवी,
मनमोर नाचे, करी थयथयाट

श्री कृष्णाची मधुर बासरी,
गाई, गोपी होती मंत्रमुग्ध
संगीत ऐकत वाढते झाड जलद,
संशोधनातून झाले सिद्‌ध

संतांनी संगीत साधना केली,
जन्मले अभंग, भारुड, भजन
भक्त ही सारे तल्लीन होती
हरिदास करिती निरुपण, किर्तन

Arhanat Music Therapy

# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

सुगम संगीताची अवीट गोडी
भावगीत, भक्तीगीत, पोवाडा, गौळणी
शब्द मनातले आकार घेती
गझल, कव्वाली, नाट्यगीत, लावणी

हृदय, कंठ, मस्तका मधूनी
स्वर उमटती ओठांवर
प्राण, अग्नीच्या संयोगाने
नाद प्रगटतो हृदय पटलावर

संगीत ऐकताना प्रसन्न वाटते
मनास लाभते अपार शांती
चिंता, दु:ख, वेदना विसरून
विविध क्षणांचे सोबती बनती.

विविध कलांतून श्रेष्ठ कला ही,
आहे जीवनाचा आत्मा
लागता समाधी संगीतातून,
दर्शन देई परमात्मा.

Anahat Music Therapy